# गुरुत्वाकर्षणाच्या शोधाचे श्रेय कोणाला?

वैज्ञानिक सिद्धान्त कशाला म्हणायचे ह्या बाबतीत श्री. निपाणीकर यांच्याशी मी सहमत नाही. गुरुत्वाकर्षणाच्या उदाहरणाने हा मतभेद स्पष्ट करता येईल. न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त मांडला म्हणजे काय केले? गुरुत्वाकर्षणाचा व्यस्त-वर्गाचा नियम मांडून त्याद्वारे त्याने ग्रहांच्या गतीचे गणित मांडले, इतकेच नव्हे तर केप्लरने निरीक्षणावरून तयार केलेले नियम त्याने गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धान्ताद्वारे सिद्ध करून दाखवले. हे सर्व गणित पूर्णपणे यशस्वीरीत्या सोडवायला न्यूटनला अनेक वर्षे लागली. १६६५ साली झाडावरून सफरचंद पडताना पाहून त्याला आकर्षणाची कल्पना सुचली असे म्हणतात. परंतु केवळ 'पृथ्वी सफरचंदाला आकर्षित करते म्हणून सफरचंद खाली पडते' एवढ्या विधानावरून त्याला 'गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधणारा' असे वैज्ञानिक म्हणत नाहीत. संपूर्ण ग्रह, उपग्रह यांच्या गतीचे गणित स्वतःच्या १६८६ साली प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात मांडल्यावरच त्याला ह्या सिद्धान्ताचे श्रेय देण्यात आले.

गणिताद्वारे सिद्ध करून निरीक्षणांबरोबर मेळ घातल्याशिवाय वैज्ञानिक सिद्धान्त प्रस्थापित होत नाही. गुरुत्वाकर्षणाबद्दल भास्कराचार्यांच्या निपाणीकरांनी दिलेल्या श्लोकात तसे गणित नाही. (फार काय, सूर्य हा ग्रहमालेच्या केंद्रस्थानावरून ग्रहांना आकर्षित करतो ही महत्त्वाची कल्पना मला तरी त्या श्लोकात दिसत नाही!) परंतु निपाणीकर अथवा इतर कोणाही प्राच्यविद्या विशारदाने ग्रहांच्या गतीचे न्यूटनने मांडलेले गणित १६६५ पूर्वी एखाद्या भारतीयाने सोडवले होते याचा पुरावा सादर केल्यास मी आपले विधान मागे घ्यायला तयार आहे. उलट, हा महत्त्वाचा शोध भारतात लागला हे सांगायला मला अभिमानच वाटेल. तसेच, जर असे गणित पुरातन ग्रंथात उपलब्ध होत नसेल तर केवळ वर दिलेल्या श्लोकावरून गुरुत्वाकर्षणाचे श्रेय भास्कराचार्यांना देणे योग्य ठरणार नाही.

शून्याचा शोध, बीजगणित इत्यादी काही गणिताच्या आद्यशाखांचे जनकपद निर्विवादपणे भारतीयांना दिले जाते, कारण तशा गणितांचा पुरावा आपल्या पुराण-ग्रंथात सापडतो. तेव्हा श्रेय कोणाला द्यावे वा देऊ नये हे ठरवणे साऱ्यासारख्या 'अव्वल दर्जाच्या' शास्त्रज्ञाच्या हातात नसते. पुरावा आपण होऊन काय ते ठरवतो.

भारतीय विज्ञानाची खरी शोकांतिका निपाणीकरांच्या तिसऱ्या श्लोकात दिसून येते. वराहमिहिराने ग्रहणांची वैज्ञानिक चिकित्सा केली पण आजही बहुसंख्य भारतीय ग्रहणांचा संबंध राहूकेतूशी जोडून त्यांच्याभोवती अंधविश्वासाचा पडदा गुंडाळून आहेत.

—डॉ. जयंत नारळीकर, मुंबई.